# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार**
**यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,**
**जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ३९३/२०२३ दिनांक – ०७/११/२०२३

## विविध बॅकामध्ये बनावट कागदपत्रे सादर करुन त्याव्दारे कर्ज घेवुन बॅकाची फसवणुक करणा-या आरोपीतास अटक – गुन्हे शाखा कक्ष - ३, विरार यांची कामगीरी

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेकडे तपासावर असलेल्या गुन्हयातील पाहिजे / फरारी आरोपींचा शोध घेऊन अटक करण्याबाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना देण्यात आल्या होत्या.

दि.२२/२/२०१८ रोजी पासुन ते दि. १९/०८/२०२१ रोजी दरम्यान आरोपीत नामे - १)चेतन शहा २)विनोद मिश्रा, ३)पंकज तिवारी, ४)दिपक शुक्ला यांनी आपसात कट करुन स्वताचे फायदयाकरीता आय.डी.एफ.सी. फर्स्ट बॅक लि. ची हेतुपुरस्पर फसवणुक करण्याचे उद्देशाने बनावट कागदपत्रे तयार करुन सदरचे कागदपत्रे बनावट असल्याचे माहीती असतांना बॅकची फसवणुक करण्याच्या उद्देशाने बॅकमध्ये सादर करुन त्याव्दारे आय.डी.एफ.सी. फर्स्ट बॅक लि. मधुन २९,२९,२५१/- रुपये कर्ज मिळवुन बॅकेची फसवणुक केली म्हणुन अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २७३/२०२१ भादविस कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१, ४७२,४७४,१२०(ब) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेणे करीता गुन्हे शाखा कक्ष -३ चे वेगवेगळे पथक तयार करुन आरोपीत यांचा तांत्रीक विश्लेषण व गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळवुन आरोपीत नामे - दिपक गुलाबचंद शुक्ला वय - ३४ वर्षे, रा. मोशी प्राधिकरण, चिखली, पिंपरी - चिंचवड, जि. पुणे. यास चिखली, पिंपरी - चिंचवड पुणे येथुन ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीत दिपक गुलाबचंद शुक्ला याचे कडे प्राथमिक तपास करता त्याने त्याचे साथिदार यांनी आय.डी.एफ.सी. फर्स्ट बॅक लि, येस बॅक प्रा.लि, सारस्वत को. ऑप बॅक लि. या बॅकेत अशाच प्रकारे बनावट कागदपत्र सादर करुन त्याव्दारे ८५ लक्ष रुपये कर्ज मिळवुन बॅकांची फसवणुक केल्याच निष्पन्न झाले आहे. उक्त आरोपीत याचा खालील नमुद गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर कलम |
|---|---|---|
| १ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २७३/२०२१ भादविस कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१, ४७२, ४७४, १२०(ब) अन्वये |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २८१/२०२१ भादविस कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१, ४७२, ४७४, १२०(ब) अन्वये |
| ३ | विरार पोलीस ठाणे | ५७५/२०२१ भा.दं.वि.कलम ४१९,४२०,४६५,४६७,४६८,४७१,१२०(ब) प्रमाणे |

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजित टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब. गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम- सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

********